अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## जागा वाटपाचा वंचितचा नवा फॉर्म्युला

**मुंबई** : महाविकास आघाडीने जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरवल्याच्या बातम्या येत आहेत. या फॉर्म्युल्यानुसार ठाकरे गटाला २०, शरद पवार गटाला १० आणि काँग्रेसला १६ जागा सोडण्यात आल्या आहेत. तर वंचित बहुजन आघाडीला दोन जागा सोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही अलबेल असल्याचं बोललं जात आहे. मात्र, असं असतानाच वंचित बहुजन आघाडीने स्वत:चा जागा वाटपाचा फॉर्म्युला सांगून महाविकास आघाडीला नवंच टेन्शन दिलं आहे. वंचितच्या या जागा वाटपाच्या फॉर्म्युल्यावरून महाविकास आघाडीत धुसफूस वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे

वंचित बहुजन आघाडीची आज संभाजीनगरात बैठक पार पडली. यावेळी लोकसभा निवडणुकीचा आढावा घेण्यात आला. तसेच उमेदवारांचीही चाचपणी करण्यात आली. त्यानंतर वंचित आघाडीच्या प्रदेश अध्यक्षा रेखा ठाकूर यांनी मीडियाशी संवाद साधला. राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस आणि वंचित आघाडी एकत्र येणार आहे. राज्यात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. त्यामुळे जागा वाटप करताना समान विभागणी व्हावी. प्रत्येक पक्षाला १२ जागा मिळायला हव्यात, असं रेखा ठाकूर यांनी म्हटलं आहे. वंचितच्या या नव्या फॉर्म्युल्यामुळे महाविकास आघाडीची चांगलीच कोंडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



राजकारणात खळबळ

# दादा लवकरच ‘लॉकअप’मध्ये जातील

## शालिनीताई यांचे भाकित



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यावर एकापाठोपाठ आव्हाने येत असल्याचे दिसत आहे. वास्तविक पाहाता अजितदादांपुढे वर तोंड करून बघत नाहीत इतकी कडक शिस्त त्यांच्यात आहे. मंत्रालयात दादांच्या पापणीच्या इशाऱ्यावर अधिकारी काम करतात,असेही सांगितले जाते. मात्र, दादांना आता कुणीही चॅलेंज द्यायला सुरूवात केली.तेव्हा त्यांची चिडचिड पत्रकारांवर वाढत चालली आहे. दादांवर अजून एक संकट येणार,असे दिसते.तसे भाकित वर्तवले गेले आहे.म्हणे दादा येत्या तीन महिन्यात तुरूंगात जातील.इतकेच नाही तर त्यांना जन्मठेपही होईल,असे त्या भाकितामध्ये म्हटले आहे. ज्येष्ठ नेत्या श्रीमती शालिनीताई यांनी आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीतून ही भविष्यवाणी वर्तवल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे.**

शिखर बँकेत २५ हजार कोटींचा गैरव्यवहार झाला आहे, त्याचे मुख्य सूत्रधार अजित पवार आहेत. हे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात सिद्ध झाले आहे. आगामी तीन ते चार महिन्यांत अजित पवार हे जेलमध्ये असतील. त्यामुळे ते पुढची कुठलीही निवडणूक लढवू शकणार नाहीत. अजित पवार यांच्या विरोधात पुढच्या तीन दिवसांत माझे १० अर्ज उच्च न्यायालयात दाखल होतील, असा इशारा शालिनीताई यांनी दिला. त्या म्हणाल्या की, राज्य सहकारी बँकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुमत होते. त्यावेळी अजित पवार यांनी तब्बल ४५ सहकारी साखर कारखाने लिलावाद्वारे विकून टाकले. त्यात माझा जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना होता. आमच्याकडून तीन कोटींच्या कर्जाचा हप्ता थकल्यामुळे त्यांनी जरंडेश्वर कारखान्याचा लिलाव काढला. त्यावेळी माझ्या कारखान्याची शिखर बँकेत ८ कोटी रुपयांची ठेव होती. त्यावेळी अजित पवार यांनी वेगवेगळ्या नावांनी १३ कारखाने विकत घेतले आहेत. आमच्या कारखान्यावरील कारवाईच्या विरोधात आम्ही कोर्टात गेलो. त्यावेळी शिखर बँकेत २५ हजार कोटींचा गैरव्यवहार झाला आहे, त्याचे मुख्य सूत्रधार हे अजित पवार आहेत, हे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात सिद्ध झाले. आम्हाला एफआयआर दाखल करण्याची परवानगी मिळाली.

आम्ही एफआयआर दाखल केला, ही घटना ऑगस्ट २०१९ मधील आहे. त्याला पाच वर्षे झाली, काहीही झालं नाही. कारण अजित पवार हे सत्तेवर आहेत, असा दावाही शालिनाताई यांनी केला.

पुढच्या तीन दिवसांत अजित पवार यांच्या विरोधात माझे दहा अर्ज उच्च न्यायालयात दाखल होतील. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शिखर बँकेतील २५ हजार कोटींच्या गैरव्यवहारप्रकरणी अजित पवार हे मुख्य सूत्रधार आहेत. त्यांच्यावर एफआरआय दाखल केलेला आहे. त्याचे चार्जशीट भरून अजित पवार यांना कोर्टासमोर उभे करावे. हा खटला फास्ट ट्रॅकमध्ये चालवावा, अशी विनंती मी करणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

शालिनीताई म्हणाल्या की, तीन कोटींसाठी जरंडेश्वरचा लिलाव काढला, त्यावेळी माझे शिखर बँकेत आठ कोटी जमा होते. २००६ पासून बँकेच्या नियमाप्रमाणे ते तीन वेळा दामदुप्पट झाले. त्यामुळे शिखर बँकेकडून आम्हाला ६४ कोटी रुपये मिळावेत, यासाठी दावा करणार आहे.

### ‘त्याला’ तर सोडणारच नाही

अजित पवार यांनी एका पोलीस अधिकाऱ्याला सीटी सिव्हिल कोर्टात पाठवून शिखर बँकेतील गैरव्यवहार हा फार लहान विषय आहे, तो कामकाजातून काढून टाकावा, अशी मागणी केली. हा अधिकारी स्वतःला सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठा समजतो का?, त्याच्या कामाचा हा काय भाग आहे का? त्या अधिकाऱ्याला तर मी सोडणारच नाही. त्याला आणि अजित पवार यांना जन्मठेपेची शिक्षा होईल, असे भाकितही त्यांनी वर्तविले.

### ‘सुपारी’चे राजकारण

माझ्या संस्थेची मालमत्ता (जरंडेश्वर कारखाना) ईडीच्या ताब्यात आहे. तो कारखाना आमचा आम्हाला द्यावा. तो आम्ही चालवतो. ईडीही भारत सरकारच्या अखत्यारित येते आणि मोदींवर माझा विश्वास राहिलेला नाही. अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडण्याची सुपारी दिली आणि त्यांना उपमुख्यमंत्री केले. हे सुपारीचे राजकारण आम्हाला पसंत नाही. तुम्ही ज्यांना उपमुख्यमंत्री केले, ते काय योग्यतेचे आहेत. असा सवालाही त्यांनी उपस्थित केला.

### फडणवीस हेच मुख्यमंत्री



शालिनीताई मुंबईत बोलत होत्या. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी अजित पवार मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असतील असे बोलले जात आहे. याबाबत शालिनीताई म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस पुढचे मुख्यमंत्री होतील. एकनाथ शिंदेदेखील मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसतील. कारण, एकनाथ शिंदे पक्ष फोडून बाहेर पडले आहेत. ते शिवसेनेच्या, बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने निवडून आले आहेत. ते केवळ सत्तेसाठी तिकडे गेले आहेत. परंतु, त्यांना सरकार चालवता येत नाही.

### मुख्यमंत्र्यांनाही हाणला टोला



राज्यात याचं बंड, त्याचं बंड, ग्रामसेवकांचे प्रश्न, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात अवकाळी पावसाने झालेलं शेतकऱ्यांचं नुकसान, मराठवाड्यातला दुष्काळ, त्यामुळे निर्माण झालेले शेतकऱ्यांचे प्रश्न, कांदा आणि ऊसाचा प्रश्न, अशा कुठल्याही प्रश्नावर मुख्यमंत्री शिंदेंना तोडगा काढता आला नाही. यंदा महाराष्ट्रात कांद्याचं राज्याच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादन झालं आहे. त्यामुळे तो कांदा निर्यात करायला हवा. परंतु, केंद्राने कांद्यावर निर्यातबंदी लागू केली. ही निर्यातबंदी उठवण्याबाबत नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी १० वेळा शब्द दिला. ते दिल्लीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटायला गेले. पण शाहांनी त्यांची भेट घेतली नाही,अशा शब्दात त्यांनी मुख्यमंत्र्यांना टोला लगावला.

## आमदारांच्या अपात्रतेच्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी अजून एक महिन्याची वेळ द्या

### अजित पवार गटाची विधानपरिषदेकडे मागणी

**मुंबई** : विधान परिषद आमदार अपात्रता सुनावणी प्रकरणी अजित पवार गटाने अपात्रतेबाबतच्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी १ महिन्याचा अधिकचा वेळ मागितला आहे. ५ डिसेंबरला आमदारांना विधीमंडळाकडून आठ दिवसांत उत्तर सादर करण्यासाठी नोटीस पाठवण्यात आल्या होत्या. यावर आता अजित पवार गटाने उत्तरासाठी एक महिना अधिकचा कालावधी मागितला. शरद पवार गटाने मात्र आमदार अपात्रतेच्या नोटिसीला उत्तर सादर केले आहे.

शरद पवार गटातील एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे, अरूण लाड यांना विधान परिषद आमदार अपात्रतेबाबत नोटिस देण्यात आली आहे. तर अजित पवार गटात अमोल मिटकरी, अनिकेत तटकरे, रामराजे नाईक निंबाळकर, विक्रम काळे, बाबाजानी दुर्राणी, सतीश चव्हाण यांना नोटीस देण्यात आली आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी (८ डिसेंबर) विधान परिषदेकडून राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. आठ दिवसांमध्ये उत्तर सादर करण्याचे आदेश या नोटिसांमधून देण्यात आले होते. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केलेल्या दाखल केलेल्या याचिकेनंतर या नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. यामध्ये अजित पवार गटाचे आमदार सतीश चव्हाण, आदिती झटकरे, विक्रम काळे, अमोल मिटकरी यांना नोटीस पाठवण्यात आली आहे.

शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांच्या याचिकेवरून रामराजे नाईक निंबाळकर यांना नोटीस काढण्यात आली होती.



**स्वामी नामाचा गजर**

सोलापूर: दंडवते महाराज मठात दत्तजयंतीनिमित्त मंगळवारी भाविकांची मोठी गर्दी होती. दत्तजन्माचा पाळणा सोहळ्याप्रसंगी गायन करताना भाविकांचा आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.

## मजरेवाडीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : होटगी रोडवरील मजरेवाडी गावात राहणाऱ्या एका ३२ वर्षीय अविवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

जयकुमार चन्नवीर लंगोटे (वय-३२, मजरेवाडीगाव) असे मयताचे नाव आहे. मंगळवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत लंगोटे हा एमआयडीसी येथील कारखान्यात कामाला होता. त्याच्या पश्चात वडील, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. याची नोंद विजयपूर नाका पोलिसात झाली. यामागचे कारण समजले नाही. तपास हवालदार मणुरे करीत आहेत.

## हत्तुरातील अपघातात तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : हत्तूर (दक्षिण सोलापूर) येथील कुलकर्णी तांड्याजवळ रस्ता अपघातामध्ये रोहीत काशिनाथ सावंत (वय-२०, हत्तूर) हा तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडला. त्याला जखमी अवस्थेत सोमनाथ सावंत (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताची नोंद विजयपूर नाका पोलिसात झाली. नेमका अपघात कशामुळे झाला. हे मात्र समजले नाही.



सोलापूर : महापालिकेसमोर मृत श्वान आणून प्रहार संघटनेने अनोखे पद्धतीने आंदोलन करून प्रशासनाचा निषेध नोंदवला.

## सोलापुरात प्रहारचे अनोखे आंदोलन

### मृत श्वान आणून वाढत्या हल्ल्याकडे वेधले लक्ष

**सोलापूर** : सोलापुरात मोकाट श्वानांनी धुमाकूळ घातला असून, त्यांच्या वाढत्या हल्ल्याने नागरिक त्रस्त झाले असून, वैतागले आहेत. त्यापार्श्वभूमीवर या मोकाट श्वानांवर आवर घालण्याची मागणी वारंवार केली जात आहे.

शहरातील लोकसेवा हायस्कूल येथून आपल्या तीन महिन्यांच्या बाळाला डोस पाजण्यासाठी निघालेल्या एका मातेला भर रस्त्यात श्वानाने घेराव घालून तिचा चावा घेतला. त्यानंतर या श्वानाला लस दिल्यानंत त्याचा मृत्यू झाला.

या घटनेने त्रस्त झालेल्या नागरिकांसह प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सदरचे मेलेले श्वान घेऊन महापालिकेमध्ये आले. त्यावेळी एकच गोंधळ उडाळा. त्यांनी महापालिकेसमोर सदरचे मृत श्वान ठेऊन प्रशासनाचा निषेधही नोंदवला. श्वानाच्या हल्ल्यादरम्यान त्या महिलेवर कसातरी तिचा स्वः ताचा बचावर करून घेतला. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी राहत ॲनिमल्स या संस्थेच्या कार्यकर्त्यांना बोलावून घेतले. त्यांनी त्या चावा घेतलेल्या श्वानाला इंजेक्शन दिले. इंजेक्शन देताच त्या श्वानाचा मृत्यू झाला.

या आंदोलनामुळे महापालिकेत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवला होता. याची माहिती मिळताच महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे हे त्या ठिकाणी येऊन प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी शहरातील मोकाट श्वानांवर बंदोबस्त करण्याचे आश्वासन देण्यात आले.

याप्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी, जिल्हा संपर्कप्रमुख जमीर शेख, शहर कार्यकारी अध्यक्ष खालीद मनियार, शहर उपाध्यक्ष मुदसर हुंडेकरी, प्रमोद इंगळे, संभाजी व्हनमाने, शब्बीर शेख, अयाज बांगी यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तीन की सहा?
दोघे एक रहा!

कल्याण
677-02-589

मुंबई
220-48-459

पूर्व भागात काँग्रेसला धक्का

## माजी नगरसेवक मेघनाथ येमूल आज भाजपमध्ये करणार प्रवेश

सुराज्य/सोलापूर

पूर्व भागातील काँग्रेसचा धडाडीचे कार्यकर्ते आमदार प्रणिती शिंदे यांचे कट्टर समर्थक माजी नगरसेवक मेघनाथ येमूल बुधवारी काँग्रेस पक्षाला रामराम करीत भाजपात पक्षप्रवेश करणार आहेत. त्यांच्यासमवेत त्यांचे शेकडो कार्यकर्ते बुधवारी भाजपात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपाचे कमळ हाती घेणार आहेत.

बुधवारी दुपारी साडेतीन वाजता हा पक्षप्रवेश होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर बुधवारी दुपारी तीन वाजता दाजी पेठ येथील सिध्दनागनाथ मंदिरातील अप्पा गणपतीची महाआरती केल्यानंतर ते भाजपाच्या सिव्हिल चौकातील पक्षकार्यालयात पक्षप्रवेश करणार असल्याचे येमुल यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले. राममंदिर येथे अयोध्या येथील कारसेवेच्या पार्श्वभूमीवर शौर्य दिन कार्यक्रमानिमित्त भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे व भाजपाचे ज्येष्ठ नेते मेघनाथ येमूल यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा भाजपा पक्षप्रवेशाबद्दल सत्कार करण्यात आला होता.पण अधिकृतपणे त्यांना पक्षात प्रवेश देण्याचा विचार केला नव्हता.



सध्या भाजपाची लाट आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची मागणी होती. भाजपमध्ये प्रवेश करण्याची त्याप्रमाणे कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवेशासाठी कोणतीही अट ठेवली नाही पक्षा जो जबाबदारी देईल ते काम करणार असल्याचे मेघनाथ येमूल यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले.

आमदार विजयकुमार देशमुख हे त्यावेळी मुंबईत होते. दोन दिवसांपूर्वी आमदार विजयकुमार देशमुख यांनी येमूल यांच्याशी भाजप पक्षप्रवेशाबाबत चर्चा करुन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करावा अशी विनंती केली. त्यानुसार बावनकुळे हे सध्या पश्चिम महाराष्ट्रातील लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा वॉरियर्सशी चर्चा सूचना ऐकण्यासाठी जिल्हा दौरा करत आहेत. बुधवारी भाजपाच्या विविध पदाधिकारी व संघटनात्मक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी ते चर्चा करणार आहेत. यात दौऱ्यात येमूल व अन्य भाजपात पक्षप्रवेश करणारे नेत्यांना बावनकुळेच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश दिला जाणार आहे. पूर्व भागात काँग्रेसला यामुळे मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचा पक्षाचा किल्ला लढवणारा आ. प्रणिती शिंदे यांचा खंदा समर्थकच भाजपाच्या कळपात जात गेल्याने भाजपची पूर्व भागात ताकद वाढली आहे.

## मुस्ती येथे पाण्याच्या हौदात पडल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

मुस्ती (दक्षिण सोलापूर) येथे पाणी घेत असताना तोल जाऊन हौदात पडल्याने गिरजाबाई दौलप्पा गडलिंगे (वय-६८) या मरण पावल्या. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. सायंकाळच्या सुमारास त्या घरातील हौदातून पाणी घेत होत्या. त्यावेळी तोल जाऊन त्या पाण्यात पडल्या. बेशुद्ध अवस्थेत त्यांना विजय बंदींछोडे (नातेवाईक) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वी मयत झाल्या.